# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २५२–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. भाऊसो तमण्णा चौंगुले,<br>मु.पो. बाज, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत , जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :–
१) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल )
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. भाऊसो तमण्णा चौंगुले, मु.पो. कासलिंगवाडी, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ६.१० नुसार वितरण कंपनीविरुध्द दि. १३.१०.२०१० ला तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार ग्राहकाने शेतीपंपास नवीन वीज पुरवठा मिळावा यासाठी वि.प.कडे अर्ज दि. १६.८.२०१० ला अर्ज केला व प्रोसेसिंग फी रु. ५०/– पावती क्र. ८०१८१०५ नुसार दि. १६.८.२०१० ला भरली. ग्राहकाचे म्हणण्यानुसार त्यांना कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार मुदतीत चलन मिळाले नाही. त्यामुळे त्यांनी प्रथम अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे तक्रार क्र. ५७७ दि. ०१.१०.२०१० ला दिली. अंतर्गत कक्षाने आदेश क्र.१०९७२ दि. ६.१०.२०१० ला झाले. अंतर्गत कक्षाने तक्रारदारास चलन देण्यास विलंब झाला असल्यास वि.प.ने भरपाई द्यावी असे आदेश दिले. मंचाकडून अपेक्षित मदत – विहीत मुदतीत चलन दिल्याने कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार वितरण कंपनीकडून भरपाई मिळावी.

वितरण कंपनीने आपल्या दि.३.११.२०१० च्या लेखी अहवालात ग्राहकाने शेतीपंप कनेक्शनसाठी दि. १६.८.२०१० ला अर्ज प्राप्त झाल्याचे मान्य केले व त्यांस दि. २८.१०.२०१० ला चलन देण्यात आले आहे. ग्राहकाने मंचाकडे दि. ११.११.२०१० ला अर्ज पाठवून त्यांना दि. ११.११.२०१० ला चलन मिळाल्याचे व त्यांच्या मुलाने सही करुन चलन घेतल्याचे म्हटले आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. ३.१२.२०१० रोजी घेतली असता तक्रारदार गैरहजर, ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित (अधिकारपत्र दिले नाही). वि.प.तर्फे अंतर्गत कक्षाचे नोडल ऑफीसर श्री. क्षिरसागर उपस्थित. श्री. खापरे यांनी वि.प.तर्फे ग्राहकास दि. २८.१०.२०१० ला चलन दिल्याचे लेखी अहवालातील म्हणणे खोटे असल्याचे प्रतिपादन केले. या उलट, वि.प.तर्फे दि. २८.१०.२०१० ला चलन तयार केले होते परंतु लाईन स्टाफने उशिरा दिले असे प्रतिपादन केले. दि. १५.९.२०१० ते दि.११.११.२०१० या कालावधीचा विलंब झाला आहे, त्याबद्दल वि.प.ने कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

मुद्दा क्र. १) ग्राहक त्याने मागणी केल्याप्रमाणे विलंबापोटी वि.प.कडून भरपाई मिळणेस हक्कदार आहे काय ?
उत्तर : होय

<u>कारणमिंमासा</u>

उभयबाजूंच्या लेखी व तोंडी कथनानुसार तक्रारदार ग्राहकाने शेतीपंप कनेक्शनसाठी दि. १६.८.२०१० ला अर्ज केला व प्रोसेसिंग फी भरली याबद्दल दुमत नाही. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार १ महिन्याच्या मुदतीत ग्राहकास चलन देणे आवश्यक होते ते दिले नाही हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट होते. विलंबाबाबत वि.प.ने लेखी अथवा तोंडी कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही. अंतर्गत कक्षाने चलन देण्यास विलंब झाला असल्यास भरपाई द्यावी असे दि. ६.१०.२०१० रोजी आदेश दिले आहेत. <u>या ठिकाणी अंतर्गत कक्ष, सांगली यांनी वि.प.चे म्हणणे घेतले किंवा नाही याबद्दल शंका उपस्थित होते. दि. १.१०.२०१० ला अंतर्गत कक्षाकडे तक्रार दाखल झाल्यानंतर दि. ६.१०.२०१० ला मोघम स्वरुपात आदेश झाला आहे. विलंब झाला असल्याचे स्पष्ट प्रतिपादन केलेले नाही तसेच भरपाईची रक्कम निश्चित केलेली नाही. अशा मोघम स्वरुपाच्या आदेशामुळे ग्राहकाच्या तक्रारीचे निवारण न होता त्याची परिणिती मंचाकडे अपील करण्यामध्ये होते. या बाबत अंतर्गत कक्ष, सांगली यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी.</u>

ग्राहकाचे दि. ११.११.२०१० च्या अर्जातील म्हणण्यानुसार त्यांना वि.प.ने दि. २८.१०.२०१० रोजी चलन दिलेले नसून ते दि. ११.११.२०१० रोजी दिलेले आहे व त्यांच्या मुलाने जत येथे जाऊन विनवनी करुन मागितल्यावर ते देण्यात आले असून त्यांच्या मुलाने चलन मिळाल्याची सहीपण केलेली आहे.

त्यामुळे कृती मानके विनियम २००५, परिशिष्ट अ प्रमाणे प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे दि. १५.९.२०१० ते ११.११.२०१० या कालावधीतील विलंबापोटी तक्रारदार ग्राहक भरपाई मिळण्यास हक्कदार आहे व वि.प.ची ती जबाबदारी आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येवून खालील प्रमाणे आदेश –

## <u>आदेश</u>

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी जत उप विभाग, विभाग कवठे महांकाळ यांनी ग्राहकास १५.९.२०१० ते ११.११.२०१० या कालावधीतील ८ आठवडे विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे एकूण रु. ८००/– भरपाई द्यावी. सदरच्या रकमेचे समायोजन २ बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरित रक्कम रोखीने अथवा चेकने ग्राहकास द्यावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.